# नियमित दिवाणी दावा क्रमांक ५२२/२०२४ मधील नि.क्र.२७ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफीयत आदेश रद्दबातल होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे अर्जातील कथन असे आहे की, सदर प्रतिवादी यांना कामधंद्यानिमीत्त बाहेरगावी जावे लागल्यामुळे त्यांना कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे कैफीयत देताआली नाही. दरम्यानचे काळात सदर प्रतिवादींविरुध्द विनाकैफीयत आदेश पारीत झाला. प्रतिवादींची कैफीयत येणे आवश्यक आहे अन्यथा प्रतिवादींचे कधीही भरुन नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफीयत आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, एक वर्षापेक्षा जास्त कालावधी प्रतिवादींना समन्स मिळुन झाला आहे.त्यांनी मुद्दामहुन कैफीयत देण्यास उशीर केला आहे. वादीस जमिनीत हिस्सा मिळु नये म्हणुन प्रतिवादी यांनी उशीर केला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्यात यावा असे म्हटले आहे. तसेच अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादी यांना प्रत्येकी रुरु.२५०००/– कॉस्ट बसवण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव, निरंतर मनाई हुकुम व पोटहिस्सा मोजणीसाठी दाखल केला असुन प्रतिवादी क्र.१ व ३ यांना दि.२६.८.२०२४ रोजी समन्सची बजावणी झालेली असुन ते दाव्यात दि.२८.८.२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसते. त्यांच्या विरुध्द दि.२९.१.२०२५ रोजी विनाकैफीयत आदेश पारीत झाला. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी दि.११.८.२०२५ रोजी दाखल केला आहे. दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले सदर प्रतिवादींनी कैफीयत दाखल करण्यास जवळपास विलंब केला आहे. मात्र सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींना कैफीयत दाखल करण्याची संधी दिल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाचा

विचार करता वादींना खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी रक्कम रुपये रु.८००/– वादीला खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येईल.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

सही/–
(एन.एस.सबनीस)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पारनेर.

दिनांकः– ११/०८/२०२५